
# मच्छीमार आणि
# त्याची पत्नी



# मच्छीमार आणि त्याची पत्नी





मराठी : अश्विनी बर्वे

# मच्छीमार आणि त्याची पत्नी

## ग्रिम ब्रदर्स

मराठी : अश्विनी बर्वे



S. F. PUBLIC LIBRARY
WEST ORANGE AVENUE



एकेकाळची गोष्ट आहे. एक मच्छीमार आणि त्याची पत्नी समुद्राच्या काठी डुक्करांच्या गोठ्यात राहत होते. तो माणूस रोज मासे पकडायला जात असे. तो मासे पकडत असे, पकडत असे.

एक दिवस समुद्रात गळ टाकून तो बसला होता आणि स्वच्छ, निर्मळ पाणी बघत होता.तो बसून राहिला, बसून राहिला.

तेव्हा त्याचा गळ पाण्यात खाली, खूप खाली गेला. जेव्हा त्याने तो वर उचलला तेव्हा त्याला गळाला एक मोठा फ्लाउडर लागलेला होता. बाहेर येताच फ्लाउंडर त्याला म्हणाला. “मच्छीमाऱ्या माझं ऐक.मी विनंती करतो, मला जिवंत सोडून दे. मी मासा नाही.मी एक राजकुमार आहे ज्याला कोणीतरी जादूने मासा केलं आहे. मला मारून तुला काय मिळेल? तसंही माझं मांस स्वादिष्ट नसेल.मला पाण्यात परत टाक आणि मी पोहत पोहत निघून जाईन.

“अरे,” मच्छीमार म्हणाला, “तुला इतकं सगळं सांगण्याची गरज नव्हती.एक फ्लाउंडर जो बोलू शकतो त्याला मी तसंही जिवंत सोडून दिलं असतं.” एवढं म्हणून मच्छीमाऱ्याने माशाला पाण्यात टाकून दिलं. फ्लाउंडर पटकन पोहत समुद्रात गेला आणि आपल्या मागे रक्ताची रेघ सोडून गेला.मच्छीमार गोठ्यात वाट बघणाऱ्या आपल्या पत्नीकडे निघून गेला.

“पतिदेव,” पत्नी म्हणाली. “आज मासे नाही पकडले?”



“नाही,” माणूस म्हणाला. “मी एक फ्लाउंडर पकडला होता पण तो म्हणाला की मी एक राजकुमार आहे आणि त्याला कोणी जादूने मासा केलं होतं,म्हणून मी त्याला सोडून दिलं.”

“तुम्हाला काय म्हणायचं की तुम्ही त्याला तुमची कोणतीही इच्छा पुरी करायला सांगितली नाही?” पत्नी म्हणाली.

“नाही,” माणूस म्हणाला. “मी कोणासाठी अभिलाषा धरू?”

“हे भगवान,” पत्नी म्हणाली, “या घाणेरड्या, वासाळलेल्या डुकराच्या गोठ्यात आयुष्यभर राहणं खूप चुकीचं आहे.कमीत कमी तुम्ही आपल्यासाठी एक छोटी झोपडी तरी मागू शकला असता. परत जा आणि त्याला हाक मारा.त्याला सांगा की आम्हांला एक झोपडी हवी आहे. फ्लाउंडर तुमची इच्छा अवश्य पूर्ण करेल.”

“अहं,” मासेमार म्हणाला, “मी कशासाठी परत जाऊ?”

“का?,” पत्नी म्हणाली, “तुम्ही त्याला पकडलं आणि मग तुम्हीच त्याला सोडून दिलं.तो नक्कीच तुमचं ऐकेन. आता लगेच जा.” मासेमार खरं तर जावू इच्छित नव्हता.पण तो आपल्या बायकोचं म्हणणं टाळू शकत नव्हता. म्हणून तो समुद्राकडे गेला.

जेव्हा तो तटावर पोहचला तेव्हा समुद्राचं पाणी हिरव्या आणि पिवळ्या रंगाचे झाले होते आणि पहिल्या इतके स्वच्छ नव्हते. तो किनाऱ्यावर उभा राहिला आणि म्हणाला.

फ्लाउंडर, फ्लाउंडर समुद्रात राहतोस तू
मी बोलवतो आहे, लवकर ये तू
माझ्या पत्नीने पाठवले आहे मला
एक इच्छा तिची पूर्ण कर तू.

तेव्हा फ्लाउंडर पोहत त्याच्या जवळ आला आणि म्हणाला, "तिला काय हवं?"

"अ हं" मच्छीमार म्हणाला, "मी तुला पकडलं होतं,म्हणून माझी पत्नी म्हणाली की मी माझी इच्छा तुला सांगायला हवी.आता ती डुक्करांच्या गोठ्यात राहू इच्छित नाही.तिला राहयला एक झोपडी हवी आहे."

"बास,परत जा," फ्लाउंडर म्हणाला, "त्या आधीच झोपडी मिळाली असेल."



मग तो माणूस घरी गेला आणि आता त्याची पत्नी डुक्कराच्या गोठ्यात नव्हती. तिथं एक छोटी झोपडी होती आणि त्याची पत्नी झोपडीच्या दरवाज्याच्या समोर एका बाकड्यावर बसलेली होती.. त्याच्या पत्नीने त्याचा हात धरला आणि म्हणाली, "जरा आत चला." ते दोघं आत गेले. झोपडीच्या आत एक छोटा हॉल होता,एक सुंदर छोटी बैठक आणि झोपण्यासाठी एक सुसज्ज खोली होती. आणि एक स्वयंपाक घर आणि कोठी घर सुद्धा होतं. जिथं एकदम भारी भांडी होती.ज्यात काही स्टीलचे आणि काही पितळीची भांडी होती. घरात जे जे काही पाहिजे असतं ते सर्व तिथं होतं. आणि मागच्या बाजुला परसदार होते, जिथं कोंबड्या आणि बदके आणि एक छोटी बाग होती.ज्यात भाज्या आणि फळांची झाडं होती.

"बघा" पत्नी म्हणाली, "हे सगळं काय चांगलं नाही?"

"हो," माणूस म्हणाला. "आता हे सगळं असंच राहू दे. आपण आता खरंच समाधानी राहू."

"त्याबद्दल आपण नंतर बोलू," त्याची पत्नी म्हणाली. मग ते जेवले आणि झोपून गेले.





एक या दोन आठवडे सगळं नीट चालू राहिलं. मग एक दिवसात पत्नी म्हणाली, “ऐका,पतीदेव,ही झोपडी खूप छोटी आहे आणि परसदार आणि बाग तर अग्डीची छोटे आहे. फ्लाउंडर सहज आपल्याला मोठं घर देवू शकतो. खरंच मला दगडांनी बांधलेल्या एका विशाल महालात राहावे असे वाटते. त्या फ्लाउंडरच्या जवळ जा आणि त्याला एक महाल द्यायला सांगा.

“अ हं, अग,” माणूस म्हणाला. “ही झोपडी आपल्यासाठी पुरेशी आहे.आपल्याला कशाला हवा राहण्यासाठी महाल?

“ काहीतरी बोलू नका,” पत्नी म्हणाली. “बास तुम्ही आता जा. फ्लाउंडर आपली कोणतीही इच्छा पूर्ण करू शकतो.”

“ नाही, अग,” माणूस म्हणाला.“ फ्लाउंडरने आत्ता आपल्याला ही झोंपड़ी दिली आहे. मला त्याच्याकडे जावंसं वाटत नाही. फ्लाउंडरला राग येऊ शकतो.”

“ तरीपण तुम्ही जा,” पत्नी म्हणाली. “तो करू शकतो. आपल्ली इच्छा पूर्ण करतांना त्याला आनंद होईल. फक्त तुम्ही जा.”

मच्छीमार दुःखी झाला.त्याला जायचं नव्हतं. तो स्वतःशीच म्हणाला, “हे बरोबर नाही.” पण तरीही तो गेला.







जेव्हा तो समुद्राच्या जवळ गेला तेव्हा पाणी बैंगनी रंगाचे आणि गर्द निळ्या रंगाचे आणि स्लेट रंगाचे झाले होते. आधी सारखे ते हिरवे आणि पिवळ्या रंगाचे नव्हते.पण समुद्र शांत होता.तो किनाऱ्यावर उभा राहिला आणि म्हणाला.

फ्लाउंडर, फ्लाउंडर समुद्रात राहतो तू
मी बोलवताच लवकर ये तू
माझ्या बायकोने पाठवलं मला
एक इच्छा तिची पूर्ण कर तू.

"तर आता तिला काय हवं?"फ्लाउंडरने विचारलं.

"अ हं " मच्छीमार म्हणाला. तो त्रासला होता. "ती दगडांनी बनवलेल्या महालात राहयचं म्हणते."

"बास परत जा,ती आधीच महालाच्या दारात उभी आहे," फ्लाउंडर म्हणाला.

मच्छीमार परत आला आणि त्याला वाटलं की तो घरी जात आहे.पण जेव्हा तो पोहचला तेव्हा तिथं दगडाचा मोठा महाल होता. महालात जाण्यासाठी त्याची पत्नी दारातच पायऱ्यावर उभी होती. तिने नवऱ्याचा हात धरला आणि म्हणाली, "चला आत."

ते दोघं महालाच्या आत आले.आत एक मोठा हॉल होता ज्याची फरशी संगमरवरी होती. खूप सारे नोकर होते जे मोठ-मोठे दरवाजे उघडत होते.भिंती चमकणाऱ्या होत्या, ज्यावर सुंदर चित्रं लावलेली होती. खोलीत शुद्ध सोन्याने तयार केलेले टेबल खुर्ची होती.छताला क्रिस्टल लावलेले होते.फरशीवर गालिचे पसरलेले होते. टेबलावर खूप सारे खाण्याचे पदार्थ आणि वाईन होती. ते एवढं होतं की त्याच्या ओझ्याने टेबल तुटून जाईल असे वाटत होतं. महालाच्या मागे मोठं अंगण होतं.जिथं घोडे आणि गायींसाठी गोठा होता, उत्तम गाड्या होत्या आणि एक अलिशान बाग होती ज्यात सुंदर फुले आणि फुलांची झाडं होती. एक पार्क होतं जे जवळजवळ अर्धा मैल लांब होतं.तिथं हरणं आणि बारशिंगे होते.आणि अशा सगळ्या वस्तू जिथं होत्या ज्याची त्यांना इच्छा होती. त्याची पत्नी म्हणाली, “हे काय चांगलं नाही का?”

“हो, नक्कीच,” मच्छीमार म्हणाला. “आणि सगळं काही असंच राहू दे,आता आपण महालात राहू या आणि आनंदात राहू.” “यावर आपण नंतर विचार करू,” पत्नी म्हणाली. “आता आपण या आरामदायी अंथरुणावर झोपू या,”एवढं म्हणून ती अंथरुणावर पडली.



दुसऱ्या दिवशी पत्नी आधी उठली.दिवस उगवलाच होता. आपल्या अंथरुणावरून पत्नीने खिडकीतून सुंदर धरती बघितली. मच्छीमार आळोखेपिळोखेच देत होता पत्नीने आपल्या ढोपराने त्याला उठवलं आणि म्हटलं, “पतिदेव उठा आणि बाहेर बघा. आपण त्या साऱ्या जागेचे राजे नाही होवू शकत का?त्या फ्लाउंडरकडे जा आणि सांगा त्याला की आपल्याला राजा करायला.”

“ठीक आहे,” पत्नी म्हणाली. “जर तुम्हांला राजा व्हायचा नसेल तर मी राजा होईल. फ्लाउंडरकडे जा कारण मला राजा व्हायचं आहे.”

“अग, मच्छीमार म्हणाला, “तुला राजा का व्हायचं आहे? मी ही गोष्ट फ्लाउंडरला नाही सांगू शकत.”

“का नाही सांगू शकत?” पत्नी म्हणाली. “आत्ता या क्षणी जा.मला राजा व्हायचच आहे.” मग तो माणूस परत निघाला.पण तो खूप त्रासला होता कारण त्याच्या बायकोला राजा व्हायचं होतं. “हे योग्य नाही, अजिबात योग्य नाही.”त्याने विचार केला. त्याला जायचं नव्हतं पण तरीही तो गेला.





आणि जेव्हा तो समुद्र किनारी पोहचला पाण्याच घाणेरडा वास येत होता आणि ते काळ्या रंगांचे झाले होते आणि समुद्राच्या तळातून लाट्या वर येत होत्या. तो किनाऱ्यावर उभा राहिला आणि म्हणाला,

“फ्लाउंडर, फ्लाउंडर समुद्रात राहतो तू
मी बोलवतो आहे, लवकर ये तू
माझ्या पत्नीने पाठवले मला
एक इच्छा तिची पूरी कर तू”


“ठीक आहे, आता तिला काय हवं आहे? फ्लाउंडर म्हणाला.

“अह,” मच्छीमार म्हणाला, “तिला राजा व्हायचं आहे.”

“बास परत जा, ती आधीच राजा झालेली असेल,” फ्लाउंडर म्हणाला.



मच्छिमार परत गेला आणि जेव्हा तो महालाजवळ पोहचला तेव्हा त्याने पाहिलं की महाल खूप मोठा झाला आहे, छान दागिण्यानी सजवलेली एक मोठा मिनार होती. प्रवेश द्वारावर पहारेकरी उभे होते आणि काही सैनिक होते आणि ढोल आणि ट्रम्पेट होती.आणि जेव्हा तो घराच्या आत गेला तेव्हा त्येन पाहिलं की सगळं काही शुद्ध सोन्याचे बनवलेले होते.आणि भिंतीवर मखमलचे पडदे आणि सोन्याचे मोठ-मोठे गुच्छ लावलेले होते.



मग हॉलचा दरवाजा उघडला गेला, तिथं सगळा दरबार हजर होता आणि सोने-हिऱ्याच्या सिंहासनावर त्याची बायको बसलेली होती.तिने एक सोन्याचा मुकुट घातलेला होता. तिच्या हातात एक राजदंड होता, तो रत्नजडित होता, बावनकशी सोन्याचा होता. तिच्या दोन्ही बाजूला सहा-सहा दासी रांगेत उभ्या होत्या. प्रत्येक दासी तिच्या आधी उभ्या असणाऱ्या दासी पेक्षा लहान होती. तो जवळ गेला आणि उभा राहिला आणि म्हणाला, “अग तू काय राजा झाली आहे?”

“हो,” पत्नी म्हणाली. “आता मी राजा आहे.” तो उभ्या उभ्या तिला बघू लागला आणि जेव्हा खूप वेळ त्याने तिच्याकडे बघितले तेव्हा तो म्हणाला, “अग किती चांगलं झालं तू राजा झालीस. आता आपल्याला कशाची इच्छा करण्याची गरज नाही.”

“नाही, पतिदेव,” पत्नी म्हणाली आणि ती खूप उत्साहित होती, “वेळ पुढे जात आहे आणि राजा होणं मला बरोबर वाटत नाही. फ्लाउंडरकडे जा. मी राजा आहे पण मला सम्राट व्हायचं आहे.”

“अग,” मच्छिमार म्हणाला, “तुला कशासाठी सम्राट व्हायचं आहे?”

“पतिदेव,” पत्नी म्हणाली, “फ्लाउंडरकडे जा.

मला सम्राट व्हायचं आहे.”

“अग,” माणूस म्हणाला. “तो सम्राट नाही करू शकत. फ्लाउंडरला मी ही गोष्ट सांगू शकत नाही. साऱ्या साम्राज्यात एकच सम्राट आहे. फ्लाउंडर सम्राट करू शकत नाही, तो असं करू शकत नाही. बिलकुलच करू शकत नाही.

“काय!” स्त्री ओरडली. “मी राजा आहे आणि तू माझी प्रजा आहे. तू आत्ताच जातोस का? निघ लगेच! जर तो राजा बनवू शकतो तर तो सम्राटही बनवू शकतो.मला सम्राट व्हायचं आहे .आत्ताच जा.”



मच्छीमाराला जावं लागलं.पण जाता जाता तो भयभीत झाला आणि विचार करू लागला. “परिस्थिती तर अधिकाधिक वाईट होत आहे.माझी बायको तर पुरी निर्लज्ज आहे. शेवटी फ्लाउंडर नाराज़ होईलच.”

असा विचार करतच तो समुद्र काठी आला.समुद्राचे पाणी काळे कुट्ट झाले होते आणि ते उकळत वर उसळत होते, ते खालून वर येत होते आणि त्यात बुडबुडे उठत होते. तेव्हाच एक वादळ समुद्रावरून गेले आणि पाण्याला गोल-गोल फिरवू लागले. घाबरून माणसाच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला.मग तो किनाऱ्यावर उभा राहिला आणि म्हणाला.


“फ्लाउंडर, फ्लाउंडर समुद्रात राहतो तू
मी बोलवतो आहे, लवकर ये तू
माझ्या पत्नीने पाठवले मला
एक इच्छा तिची पुरी कर तू”

“ठीक आहे, आता तिला काय हवं आहे?फ्लाउंडर म्हणाला.

“फ्लाउंडर,” तो म्हणाला, “माझ्या बायकोला आता सम्राट व्हायचं आहे.”

“बास, परत जा,” फ्लाउंडर म्हणाला,” ती आधीच झालेली असेल.”






त्यांनी त्याच्यासाठी दरवाजा उघडला जो सोन्याचा बनवलेला होता.जेव्हा तो आता आला तेव्हा त्याने पाहिले की तयची पत्नी एका सिंहासणावर बसली आहे, जे सोन्याचे आहे आणि कमीत कमी दोन मैल उंच होते आणि तिने सोन्याचा विशाल मुकुट घातला आहे जो तीन मित्र उंच आहे आणि त्यावर क्म्र्नी आणि हिरे बसवलेले आहे. एका हातात तिने राजदंड धरला आहे आणि दुसऱ्या हातात सही सफरचंद.तिच्या दोन्ही बाजूला दोन रांगेत तिचे रक्षक उभे होते. प्रत्येक  रक्षक त्याच्या मागच्या रक्षकापेक्षा उंचीने लहान होता. सगळ्यात विशाल रक्षक दोन मैल उंच होता आणि सगळ्यात लहान रक्षक करंगळी इतका छोटा होता.पत्नीच्या समोर कितीतरी राजकुमार आणि सामंत हात बांधून उभे होते. मच्छीमार पुढे आला आणि त्यांच्या बरोबर उभा राहिला आणि म्हणाला, “अग, तू आता सम्राट झाली आहे.”



आणि जेव्हा मच्छीमार परत आला तेव्हा सारा महाल चमकणाऱ्या संगमरवराचा झाला होता.ज्यावर सोन्याच्या दागिन्यांनी मढवलेल्या दगडाच्या मुर्त्या लावल्या होत्या.दाराच्या समोर शिपाई,ढोल,ट्रम्प वाजवत  मार्चिंग करत होते. महालात राजकुमार आणि सामंत इकडे –तिकडे फिरत होते जसे की ते दास आहेत.





"हो" पत्नी म्हणाली, "मी  सम्राट आहे."

मग जवळ येवून त्याने पत्नीला नीट बघितले, आणि खूप वेळ बघितल्यावर तो म्हणाला, "अग तुझ्यासाठी हे किती छान आहे की तू सम्राट झालीस."

"पतिदेव," ती म्हणाली. "तू नुसता उभा का राहिला आहेस?आता मी सम्राट झाले आहे,पण मला पोप व्हायचं आहे. फ्लाउंडरकडे जा"

"अग," मच्छीमार म्हणाला. "तुला अजून काय हवं? तू पोप होवू शकत नाही. इसाई जगात एकच पोप असतो.तो तुला पोप बिलकुल करू शकणार नाही."

"पतिदेव," ती म्हणाली. "मला पोप व्हायचं आहे, आता जा. मला पोप व्हायचंच आहे."

"नाही," मच्छीमार म्हणाला, "मी ही गोष्ट त्याला सांगू शकत नाही. या सगळ्याचा शेवट चांगला होणार नाही.हे योग्य नाही.फ्लाउंडर तुला पोप करू शकणार नाही."

"पतिदेव, काय फालतू गोष्टी करत आहात," पत्नी म्हणाली. "जर तो सम्राट करू शकतो तर तो पोपही करूच शकतो.आत्ता या क्षणी जा, मी सम्राट आहे आणि तू माझी प्रजा आहे, तरी तू जाणार नाहीस का?"

मच्छीमार भयभीत झाला होता.तो समुद्रावर गेला पण तो खूप घाबरलेला होता आणि थरथर कापत होता.त्याचे पाय थरथरत होते.पृथ्वीवर वादळ आले होते आणि आकाशात ढग जमा होत होते. रात्रीसारखा अंधार पसरला होता आणि झाडांची पानं पडत होते.समुद्रात लाट्या अशा उसळत होत्या की जसं काही पाणी उकळत आहे.लाटा उंच उठून तटावर आदळत होत्या.दूर समुद्रात लाटांवर हेलकावे खाणारे जहाज संकटाचे संकेत पाठवत होते.पण तरीही आकाशाचा मधला छोटासा भाग जो निळा होता,खरंतर सगळीकडचे आकाश लाल झाले होते आणि असं वाटत होतं की एक भयंकर तुफान येणार आहे. . मच्छीमार समुद्राच्या तटावर उभा होता.तो निराश आणि घाबरलेला होता. तो म्हणाला.

“फ्लाउंडर, फ्लाउंडर समुद्रात राहतो तू
मी बोलवतो आहे, लवकर ये तू
माझ्या पत्नीने पाठवले मला
एक इच्छा तिची पूरी कर तू”
“ठीक आहे, आता तिला काय हवं आहे?फ्लाउंडर म्हणाला.
“अरे, फ्लाउंडर,” तो म्हणाला. “माझ्या पत्नीला पोप व्हायचं आहे,”
“बास परत जा, ती आधीच झाली असेल.” फ्लाउंडर म्हणाला.





मग तो परत गेला आणि जेव्हा तो घरी पोहचला तेव्हा त्याने पाहिले की तिथं एक विशाल चर्च होते. ज्याच्या आसपास महालाच्या शिवाय काहीच नव्हते.तो गर्दीला लोटत पुढे गेला.आत हजारो मेणबत्त्याचा प्रकाशात सगळं काही झगमगत होतं. त्याच्या बायकोने सोन्याचे कपडे घातले होते. एका खूप उंच सिंहासनावर ती बसली होती.तिने सोन्याचे तीन विशाल मुकुट घातले होते. आणि तिच्या चारी बाजूला खूप थाटमाट आणि धूमधाम होती. तिच्या दोन्ही बाजूला मेणबत्तीच्या दोन रांगा होत्या. सगळ्यात मोठी मेणबत्ती चर्चच्या सगळ्यात मोठ्या बुरूजा इतकी उंच आणि मोठी होती आणि सगळ्यात लहान मेणबत्ती घरात वापरणाऱ्या मेणबत्ती इतकी छोटी होती. सगळे सम्राट आणि राजा तिच्या समोर गुडघे टेकून वाकले होते आणि तिचे पाय धरत होते. .

“अग” मच्छीमार तिच्याकडे सरळ बघत म्हणाला, “ तू आता पोप झालीस.”

“हो,” ती म्हणाली, “मी पोप आहे.”

मग तो समोर येवून तिच्याकडे बघू लागला आणि त्याला असं वाटलं की तो चमकणारा सूर्य बघत आहे.जेव्हा अशा तऱ्हेने तिच्याकडे बऱ्याच वेळ बघितले आणि म्हणाला, “अग, तुझ्यासाठी किती छान आहे ना तू पोप झालीस ते.”

पण ताठ होत सरळ बसली आणि जराही हलली नाही.

मग तो म्हणाला, “ अग, तू संतुष्ट हो.तू पोप झाली आहेस.आता तू आणखीन काही होवू शकत नाही.”

मी याच्यावर नंतर विचार करेन,” ती म्हणाली. यानंतर ते दोघे झोपायला गेले.“.



पण ती संतुष्ट नव्हती. तिची लालसा तिला झोपू देत नव्हती. प्रत्येक क्षणी ती विचार करत होती की आता ती कोण होवू शकते.

मच्छिमार गाढ झोपला – त्यादिवशी तो खूप पायी चालला होता-पण त्याची बायको झोपू शकली नाही आणि सगळी रात्र ती कूस बदलत राहिली.प्रत्येक वेळी ती विचार करत होती की ती काय होवू शकते.पण तिला समजत नव्हते. जसा सूर्य उगवणार आणि तिने पहाटेची लालिमा बघितली, ती अंथरुणात उठून बसली आणि बाहेर निरखून बघू लागली. आणि जसे तिने बाहेर बघितले. “अहाहा!”तिने विचार केला, “ती सूर्य-चंद्राचा उदय करू शकेल का?”

“पतिदेव,” ती म्हणाली आणि तिने आपलं ढोपर त्याला टोचलं, “ऊठ आणि फ्लाउंडर जवळ जा. मी महान ईश्वर होवू इच्छिते.”

मच्छीमार झोपेतच होता पण पत्नीचे बोलणे ऐकून तो इतका घाबरला की तो अंथरुणावरून खाली पडला.त्याने विचार केला की त्याने काही चुकीचे ऐकले आहे आणि त्याने आपले डोळे चोळले आणि म्हणाला, “ओह, अग तू काय म्हणते आहेस?”

“पतिदेव,” पत्नी म्हणाली. “जर मी सूर्य आणि चंद्राचा उदय करू शकले नाही आणि फक्त ते उगवतानाच पहात राहिले तर ते मला सहन होणार नाही. जोपर्यंत मी चंद्र आणि सूर्याचा उदय करू शकत नाही तोपर्यंत माझ्या मनाला शांती मिळणार नाही.”मग तिने मच्छीमारा कडे एका भयानक दृष्टीने पाहिले की तो थरथरू लागला. “आत्ता या क्षणी जा. मला आता महान ईश्वरा समान व्हायचं आहे.”

“ओह, अग,” मच्छीमाराने पत्नी समोर गुडघे वाकवले आणि वाकून तो म्हणाला “फ्लाउंडर असं करू शकत नाही. तो पोप आणि सम्राट करू शकतो-मी विनंती करतो. परत विचार कर. आणि पोपच रहा.” यावर पत्नी रागावली आणि इतकी हिंसक झाली की तिचे डोक्यावरचे केस हवेत ताठ उभे राहिले. तिने तिचा गाऊन फाडून टाकला आणि पतीला ठोकर मारू लागली आणि ओरडत म्हणाली,
“मी सहन करू शकत नाही,
सहन करू शकत नाही!
तू आता जातोस की नाही?”





त्याने आपले कपडे नीट केले आणि वेड्यासारखा पळाला. पण बाहेर प्रचंड वादळ होते आणि त्याला आपले पाय स्थिर ठेवणे मुश्कील होत होते. झाडं पडत होती, घरं पडत होती आणि पहाड थरथरत होते आणि दगड समुद्रात गडगडत पडत होते.आकाशात अंधार झाला होता.ढग गर्जत होते.विजा चमकत होत्या. समुदाचे काळे पाणी मिनार आणि पहाड इतके उंच उडत होते.आणि सगळ्या लाट्यावर सफेद फेस होता.तो ओरडला पण त्याला त्याचा आवाजही ऐकू आला नाही.

“फ्लाउंडर, फ्लाउंडर समुद्रात राहतो तू
मी बोलवतो आहे, लवकर ये तू
माझ्या पत्नीने पाठवले मला
एक इच्छा तिची पुरी कर तू”

“ठीक आहे, आता तिला काय हवं आहे?फ्लाउंडर म्हणाला.

“अरे, फ्लाउंडर,” तो म्हणाला. “माझी पत्नी आता महान ईश्वरा समान होवू इच्छिते.”

“बास परत जा, ती आधीच डुक्करांच्या गोठ्यात बसलेली असेल.”



आणि आज पर्यंत ते दोघं डूक्करांच्या गोठ्यात बसलेले आहेत..



**समाप्त**

